# पंचधारा

## अनुवाद विशेषांक

वर्ष : ६४ अंक तिसरा
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१



मराठी साहित्य परिषद,
तेलंगण राज्य, हैदराबाद

RNI Reg. No. 32307/79

मूल्य : ६०/-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## अनुवाद विशेषांक

वर्ष ६४ वे, अंक तिसरा
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१
अश्विन कार्तिक मार्गशीर्ष १९४३

**संपादक मंडळ**

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
डॉ. शोभा देशमुख
डॉ. गीता काटे
प्रा. मीना जागीरदार
श्रीमती विद्या मक्तल
श्री. माधव रामराजे चौसाळकर
या अंकासाठी संपादन साहाय्य प्रा. चिन्मय मधू घैसास

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद - ५०० ०२७
RNI Reg. No. 32307/79

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद - ५०० ०२७.
**दूरध्वनी :** (०४०) २४६५५७०६३, **भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क** - म.सा.प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षाची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code - IBKL0000594
(For both accounts)
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. २००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. ५००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. २,०००/-
(वर्गणी शक्यतो डी.डी.ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती

या अंकाचे मूल्य : रु. ६०/-
टपाल खर्च रु. ३५/-

अक्षरजुळणी : अमोघ आर्ट्स, ५७५ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन : ९३२६०८६२८५

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

मुखपृष्ठ संकल्पना आणि सजावट : अमोघ आर्ट्स, पुणे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखांशी, विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

******************************************

# अनुक्रमणिका

******************************************

संपादकीय ........................................................................ ५

प्रस्तावना
प्रा. चिन्मय मधू घैसास ........................................................ ८

१. २१ वे शतक आणि भाषांतर
प्रा. पूर्वा पंडित वस्त ........................................................ १०

२. ललितेतर साहित्याचे भाषांतर
प्रा. चिन्मय मधू घैसास ........................................................ १६

३. भाषांतर : व्यावसायिक क्षेत्रानुरूप रोजगार संधी
प्रा. विनय मडगावकर ........................................................ २१

४. तेलंगणातील क्रमिक पुस्तकांचे मराठी अनुवाद व अडचणी
अनघा साठे ........................................................ ३१

५. मराठीतील अनुवाद : अनुसर्जन आविष्काराची आवश्यकता
डॉ. ज्योती धर्माधिकारी ........................................................ ३५

६. अनुवादाची निकड ('मराठी छंदःशास्त्रविषयक ग्रंथांच्या संदर्भात')
डॉ. शुभांगी पातुरकर. ........................................................ ४६

७. अनुवाद : दोन अनुभव
डॉ. उमा वि. कुलकर्णी ........................................................ ५१

८. कोंकणी-मराठी भाषांतर एक दृष्टिक्षेप
प्रा. विनायक लक्ष्मण बापट ........................................................ ५७

९. डॉ. एस. एल. भैरप्पांच्या कादंबऱ्यांची भाषांतरे
डॉ. सुप्रिया सहस्त्रबुद्धे ........................................................ ६४

१०. मोलीएरच्या 'लावार' आणि 'मेदसां मालग्रे लुई' यांच्या कोंकणी भाषांतरांचे विश्लेषण
शौर्या दळवी ........................................................ ७१

११. **अनुवादाद्वारे आंतर-सांस्कृतिक देवाणघेवाण - प्र. के. अत्रे लिखित 'बुवा तेथे बाया' : एक अभ्यास**
प्रा. क्षमा धारवाडकर ........................................ ७८

१२. **लुगट । लुगडं**
मूळ कवी - संजय बोरकर, मराठी भाषांतर - प्रा. चिन्मय मधू घैसास ... ८२

१३. **घनचेकटर कटर कटर कटर**
मूळ कविता - डॉ. हनुमंत चोपडेकर,
मराठी अनुवाद - विनायक ल. बापट ........................................ ८३

१४. **सान सान कागदी व्हडी**
मूळ कविता - परेश कामत, मराठी अनुवाद - विनायक ल. बापट ....... ८५

१५. **खार मांत्रिक (The Squirrel Shaman)**
मूळ कथा : डॉ. जॉन इ. स्मेल्सर, अनुवाद : उषा प्रभुणे ................ ८६

१६. **शल्य**
मूळ कथा : प्रा. नरेश नाईक, अनुवाद : प्रा. चिन्मय मधू घैसास ......... ९०

१७. **साहित्यवड दिवाळी अंक २०२१ - प्रकाशन वृत्तांत**
अरुण डवलेकर ........................................ ९४

पुस्तक परिचय
**द रिचेस्ट मॅन इन बॅबिलॉन** - डॉ. अनिल कुलकर्णी .................... ९८
**मौत से जिंदगी की ओर** - आराधना कुलकर्णी .................... १०३
**अथांग** - विद्या मक्तल ........................................ १०६

**लेखक परिचय** ........................................ १०९

****************************************************

# संपादकीय

****************************************************

पंचधाराचा हा नवा 'अनुवाद विशेषांक' अनुवादकांचा अभ्यास, परिश्रम व स्वतंत्र कल्पनाशक्ती यावर प्रकाश टाकणारा आहे. तसेच अनुवाद आणि भाषांतर यामधील फरक लक्षात आणून देतानाच, विविध क्षेत्रात आज अनुवादाला असणाऱ्या महत्त्वाकडे आपले लक्ष वेधून घेईल. अनुवाद आणि पंचधारा यांचे निरंतर नाते आहे. विविध भाषांतील उत्तम साहित्य अनुवादीत करून मराठी जनांपर्यंत पोहोचवणे हे कार्य पंचधारा ६०हून अधिक वर्षे करीत आहे. भारतीय भाषांमध्ये होत असलेला साहित्यविचार आणि कलाविचार यांची मराठी वाचकांना ओळख व्हावी, मराठी वाचकांच्या जाणिवा विस्तारत जाव्यात आणि अनुभवविश्व समृद्ध व्हावे, हा त्यामागे मुख्य विचार आहे. आमच्या या मूळ ध्येयधोरणांशी आम्ही कायम बांधील राहिलो आणि म्हणूनच मराठी साहित्यविश्वात आणि अभ्यासकांत पंचधाराला आपले स्थान टिकवता आले. यासाठी सर्व मराठी रसिकजनांचे मी मनापासून आभार मानते.

गोवा विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक, भाषांतरकार आणि लेखक, प्राध्यापक चिन्मय मधू घैसास यांचे संपादकीय साहाय्य या अंकाला लाभले आहे. एकविसावे शतक आणि भाषांतर, ललित व इतर साहित्याचे भाषांतर, भाषांतराला असलेल्या व्यावसायिक क्षेत्रानुसार रोजगार संधी या तरुणाईचा स्पर्श झालेल्या लेखांमधून आपल्याला अनुवादाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी मिळेल. क्रमिक पुस्तकांचे मराठी अनुवाद करताना एका शिक्षिकेला येणारे अनुभव वाचताना परप्रांतात मराठी टिकवणे किती अवघड आहे हे आपल्या लक्षात येईल. परभाषेतून मराठीमध्ये लोकप्रिय होणाऱ्या उपयोजित साहित्याचे मराठीतील स्थान लक्षात आणून देताना मराठीत स्वतंत्रपणे या विषयावर लेखन व्हावे अशी तळमळही आपणास ज्योती धर्माधिकारी यांच्या लेखातून जाणवेल. मराठीमधील छंदशास्त्र या विषयातील समृद्ध आणि संपन्न असणारे वाङ्मय अन्य भाषांत अनुवादित होण्याची आवश्यकता डॉ. शुभांगी पातुरकर यांनी प्रतिपादित केली आहे. कोकणी-मराठी,

फ्रेंच-मराठी, कधी कधी भाषानुवाद तर क्वचित वाङ्मयचौर्य यांची झलक मनोरंजनाचा हलका शिडकावा करेल. मराठीमध्ये अनुवादित साहित्य मोठ्या प्रमाणात येत आहे, आपण त्याला फार छान प्रतिसादही देत आहोत. अनुवाद करताना येणाऱ्या अनुभवांचा परिचय उमाताई कुलकर्णी यांच्या लेखातून होईल.

सुप्रसिद्ध कन्नड लेखक भैरप्पा हे आता मराठीमध्ये अन्य कोणत्याही मराठी लेखकाइतकेच परिचयाचे आणि लोकप्रिय लेखक आहेत. भैरप्पा, यांच्या साहित्याबद्दल प्रसिद्ध कन्नड साहित्यिक आणि मान्यवर भरभरून बोलतात. त्याचवेळी भैरप्पांना आपले मानणाऱ्या सामान्य वाचकांना त्यांच्या लेखनाबद्दल काय वाटते, हे समजून घेण्याचा प्रयत्न, त्यांच्या साहित्याच्या प्रेमी विजया हारन यांनी काही वर्षांपूर्वी सुरू केला. वाचकांना लिहितं केलं. हॉटेलमधून भैरप्पांच्या पुस्तकांचा संग्रह वाचकांसाठी उपलब्ध करून ठेवला. भैरप्पांच्या साहित्यासाठी सार्वजनिक ठिकाणी एक कोपरा राखून ठेवला जावा यासाठी विजयाजींनी प्रयत्न केले. रेल्वे ड्रायव्हरपासून सामान्य गृहिणींपर्यंत सर्व प्रांतातील, सर्व भाषिकांची, भैरप्पा संबंधित मते त्या समजून घेत गेल्या. आपले भैरप्पा अन्य भाषेमध्ये नेणाऱ्या अनुवादकांची नोंद घ्यावी, त्यांचे अनुभव समजून घ्यावे असा ध्यास विजया हारन यांनी घेतला. म्हैसूर आकाशवाणीच्या संचालक पदावरून निवृत्त झाल्यानंतर भारतीय भाषांमध्ये पसरलेल्या भैरप्पांच्या अनुवादकांचा शोध श्रीमती विजया हारन यांनी सुरू केला. कित्येक अनुवादकांची नोंद होती पण प्रकाशकांचा त्यांच्याशी आता संपर्कही नव्हता. त्यांच्या नातेवाईकांकडे व संबंधित भाषेतील अन्य लेखकांपर्यंत विजयाताई पोहोचल्या आणि त्यांनी भैरप्पांच्या सर्व अनुवादकांना एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये व पुस्तकाच्या निर्मितीमध्ये सामील करून घेतले. या पुस्तकाचा परिचय डॉ. सुप्रिया सहस्त्रबुद्धे यांनी आपल्याला लेख स्वरूपात करून दिला आहे.

आमच्या मराठीतीलसुद्धा अनेक लेखक असे अन्य भाषेत गेले आहेत. त्या अनुवादकांशी संपर्क करून, अन्य भाषेत आपल्या मराठी लेखकाचे कसे स्वागत झाले आहे याची ओळख करून देण्याचे काम आजपर्यंत कुठे झाले असले तरी आमच्यापर्यंत ते पोहोचले नाही. ज्येष्ठ लेखक वि. स. खांडेकर यांची जन्मशताब्दी मराठी साहित्य परिषदेने हैदराबाद येथे अभिनव पद्धतीने साजरी केली होती. तीन दिवस चाललेल्या या शताब्दी समारंभात तेलुगु, तमिळ, कन्नड, मल्याळी, गुजराती, हिंदी व मराठी अशा विविध भाषेत लोकप्रिय असलेल्या खांडेकरांच्या एकेका कादंबरीचा परिचय त्या भाषेतील लोकांनी करून दिला होता. तेव्हा मराठी

खांडेकरांचे अखिल भारतीयत्व लक्षात आले. खांडेकर यांना तमिळी लोक आपलाच लेखक मानतात. महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांच्या सर्व साहित्याची नोंद करणाऱ्या ज्योती दिनेश ठाकूर यांच्याकडे मी यासंदर्भात संपर्क केला तेव्हा पुलंची अन्य भाषेत गेलेल्या पुस्तकांची यादी त्यांचेकडे उपलब्ध झाली. हे कामही महत्त्वाचे आहेच.

अनुवादासंबंधी विविध प्रकारे जाणून घेतल्यानंतर तीन कवितांचे अनुवादही मूळ कवितांसह आम्ही येथे दिले आहेत. याशिवाय अमेरिकेत राहून, तेथील लेखकांचे साहित्य आवर्जून आपल्यापर्यंत पोहचवणाऱ्या उषा प्रभुणे यांनी आपल्यासाठी एक कथा अनुवादित केली आहे. कोंकणी कवितांची ओळख विनायक बापट यांनी अनुवादातून करून दिली आहे. चिन्मय मधू घैसास हे कोंकणी व मराठी दोन्ही भाषेत लेखन व अनुवादही करतात. त्यांचीही एक अनुवादित कथा येथे आहे. असा हा अनुवाद विशेषांक अनुवादाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारा आहे.

या अनुवाद विशेषांकासाठी नेहमीप्रमाणे शिल्पा प्रकाशनच्या मंजरी ताम्हनकर यांनी विशेष सहकार्य केले आहे. सुबक अक्षरजुळणी व मुखपृष्ठ करून देणारे श्री. हरीश घाटपांडे तसेच मुद्रक गणेश मुद्रणालय यांनी उत्तम छपाई करून दिली त्याबद्दल त्यांचेही आम्ही आभारी आहोत. हैदराबादेत राहून विविध विषयांना न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करतो त्यामागे सर्व नवोदित आणि प्रथितयश लेखकांचे तसेच चोखंदळ वाचकांचे सहकार्य असते हे आवर्जून नमूद करायला हवे.

**डॉ. विद्या देवधर**
प्रमुख संपादक, पंचधारा.

*******************************************

# प्रस्तावना

*******************************************

जागतिकीकरणाच्या आजच्या काळात विविध देश, प्रांत, समाज, संस्कृती, भाषा यांच्यातील दरी मिटवण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे भाषांतर. भाषांतराच्या माध्यमातून होणारे आदानप्रदान समाजाच्या सर्वांगीण विकासाला बळकटी देणारे आहे. इंग्रजी साहित्याचा परिचय झाल्यानंतर मराठीत भाषांतराचे युग सुरू झाले. ललित साहित्याच्या भाषांतराबरोबरच आज ललितेतर भाषांतराच्या प्रांतातही दिवसागणिक भर पडत आहे. भाषांतराच्या कामाची व्याप्तीच नव्हे तर त्याचे स्वरूपही बदलत चालले आहे. नवनवीन क्षेत्रांत वेगवेगळ्या पद्धतीने भाषांतराची गरज आज निर्माण झाली आहे.

एकंदरीत जागतिक पटलावर आणि विशेषत: भारतीय परिस्थितीत बहुभाषिकत्व आज मोठ्या प्रमाणात वाढीस लागले आहे. राजकारण, पर्यटन, व्यापार, संस्कृती, साहित्य, शासकीय व्यवहार, व्यापार, जाहिरात, मनोरंजन, पर्यटन यांसारख्या क्षेत्रांत अन्य देश, प्रदेश, प्रांत, समाज, संस्कृती, भाषा यांची माहिती करून घेण्याची जिज्ञासा लोकांच्या मनात वाढू लागली आहे. भाषांतराच्या अत्याधुनिक, नाविन्यपूर्ण आणि त्याचबरोबर आव्हानात्मक गरजांची पूर्तता करण्यासाठी भाषांतरकारांसाठी प्रगत अशी साधनेही आज उपलब्ध होऊ लागली आहेत. माहिती-तंत्रज्ञानातील बदल, विकास, संशोधन यांचा प्रचंड लाभ भाषांतरकारांना होत आहे.

भाषांतरकारांसाठी आज नवनवीन मंच आणि व्यासपीठे उपलब्ध आहेत. एक स्वतंत्र आणि पूर्णवेळ व्यवसाय म्हणून आज भाषांतराकडे पाहणे सहज शक्य झाले आहे, परंतु या क्षेत्रात टिकून राहण्यासाठी कौशल्य, कठोर परिश्रम आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती नितांत आवश्यक आहे. भाषांतराशी निगडित विविध व्यवसाय क्षेत्रे, विविध स्तरांवरील मार्गदर्शक, अभ्यासक, संशोधक, शासकीय यंत्रणा, शिक्षण क्षेत्रातील या विषयाचे जाणकार या सर्व घटकांनी एकाच पातळीवर एकत्र येणेही तेवढेच जरुरीचे आहे. भाषांतराच्या क्षेत्रातील विविध संधी, त्यातील

अडचणी, आवश्यक साधनांची पूर्तता, अनुपलब्ध साधनांची (उदा. विशिष्ट शब्दकोश) निर्मिती यांसाठी हे सर्व घटक एकत्र येणे अत्यावश्यक आहे.

भाषांतराच्या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्यांसाठी भाषांतराचा अनुभव तेवढाच महत्त्वाचा आहे. भाषांतराचे केवळ सैद्धांतिक ज्ञान असून आज भागत नाही तर त्यासाठी प्रचंड अनुभवही गरजेचा आहे. एखाद्या प्रसंगी तातडीने भाषांतर करून देताना अनुभवाची शिदोरी निर्णायक ठरते. भाषांतरामुळे भाषा-समृद्धीचे मार्ग अधिक खुले होतात. ललित आणि ललितेतर या दोन्ही पातळ्यांवरील भाषांतराची आपापली स्वतंत्र आणि वेगळी आव्हाने आहेत. त्यांचा अभ्यास करून, त्यासाठीची आवश्यक तयारी करून या क्षेत्रात पाऊल ठेवल्यास सहजपणे भाषांतर करणे शक्य होईल. आजही कित्येक भाषा भाषांतराच्या व्यवहारापासून दूर आहेत. त्या भाषांतील उत्तमोत्तम साहित्य आणि विचार भाषांतराच्या माध्यमातून जगासमोर येण्याची गरज आहे. ललित साहित्याच्या भाषांतरासाठी भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक जाणीव महत्त्वाची आहे. तांत्रिक वा व्यावहारिक क्षेत्रातील भाषांतरासाठी नवनवीन कौशल्यांची गरज आहे.

प्रस्तुत अंकात भाषांतराच्या विविध आयामांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ललितेतर साहित्याच्या भाषांतराविषयी ('मन की बात'च्या विशेष संदर्भात) प्रा. चिन्मय मधू घैसास यांचा लेख आहे. फ्रेंच भाषेतून मराठी आणि कोंकणी यासारख्या भाषांत होणारी भाषांतरे यांच्या संदर्भात प्रा. क्षमा धारवाडकर आणि प्रा. शौर्या दळवी यांचे लेख आहेत. कोंकणी-मराठी भाषांतरासंदर्भात प्रा. विनय बापट तर एकविसाव्या शतकातील भाषांतर व्यवहारासंदर्भात प्रा. पूर्वा वस्त यांचा लेख आहे. भाषांतर आणि रोजगार संधी यावर प्रा. विनय मडगांवकर यांचा लेख या अंकात समाविष्ट आहे.

'पंचधारा'चा हा भाषांतर विशेषांक वाचकांच्या हाती देताना आम्हास विशेष आनंद होत आहे. या अंकाद्वारे भाषांतराविषयीची वेगळी, सखोल आणि विस्तृत माहिती वाचकांपर्यंत पोहोचेल तसेच भाषांतराच्या काही अज्ञात पैलूंवर प्रकाश पडेल अशी आशा आहे. वाचक, अभ्यासक, संशोधक, समीक्षक या विशेषांकाचे नक्कीच स्वागत करतील याची खात्री आहे. धन्यवाद.

**– प्रा. चिन्मय मधू घैसास**

■

********************************************

# ललितेतर साहित्याचे भाषांतर


## प्रा. चिन्मय मधू घैसास


********************************************

आज एकविसाव्या शतकात भाषांतराला फारच मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. विविध क्षेत्रांतील वेगवेगळ्या प्रकारच्या वाढत्या मागणीमुळे भाषांतराचे क्षेत्र विस्तारित होत आहे. ललित साहित्याच्या भाषांतरासोबतच ललितेतर क्षेत्रातील भाषांतराची आवश्यकता आज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. जागतिकीकरण, अर्थव्यवस्थेत होणारी प्रचंड वाढ, बाजारपेठांचा होणारा विस्तार यांसारख्या कारणांमुळे आज अनेक नवनवीन क्षेत्रांत भाषांतराची गरज भासू लागली आहे. वस्तू आणि उत्पादनांची माहिती, जाहिराती, औपचारिक कागदपत्रे यांसारख्या बाबींसाठी उद्योग क्षेत्रात भाषांतराची गरज वाढली आहे. जागतिक स्तरावर आपल्या उत्पादनांचा खप वाढवण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या वेगवेगळ्या देशांतील स्थानिक भाषेत लोकांपर्यंत आपले उत्पादन पोहचवण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

ललितेतर भाषांतराची क्षेत्रे अफाट आहेत. माहितीग्रंथ, तांत्रिक साहित्य, औद्योगिक-आर्थिक क्षेत्रातील प्रकल्पांची माहितीपुस्तिका वा अहवाल, उद्योगसमुहांची मुखपत्रे, जाहिराती, सूचना, प्रचार साहित्य, वस्तूच्या वापराविषयीची माहिती, स्थळवर्णन, पत्रव्यवहार, प्रसारमाध्यमातील बातम्या, धार्मिक साहित्य, रोजनिशी, आठवणी इत्यादी बाबींचा त्यात समावेश करता येईल.

ललित साहित्याप्रमाणेच ललितेतर साहित्याच्या भाषांतरासमोर काही विशिष्ट अडचणी असतात. त्यांचे स्वरूप हे त्यांच्या लेखनामागील निकडीत सापडते. विविध प्रकारच्या ललितेतर साहित्याच्या लेखनात विविध हेतू बाळगलेले असतात. तात्कालिक स्वरूपाचे, ताबडतोब करावे लागणारे, फुरसतीने केलेले, केवळ व्यावहारिक गरजांपोटी केलेले अशा वेगवेगळ्या हेतूने हे ललितेतर साहित्य भाषांतरित केले जात असते. अशा या ललितेतर साहित्याचे भाषांतर करणे ही भाषांतरकारासाठी एक फार मोठी कसोटी असते. स्रोत भाषेतील आशय अर्थभेद होऊ न देता लक्ष्य भाषेत आणणे ही कसोटी ललित आणि ललितेतर अशा दोन्ही प्रकारच्या भाषांतरात असतेच; परंतु, ललितेतर साहित्याचे भाषांतर करताना या

क्षेत्रात विशिष्ट अशा अडचणींचा सामना भाषांतरकाराला करावा लागतो. ललित साहित्याचे भाषांतर भाषांतरकाराच्या आंतरिक निकडीने प्रेरित असते, मात्र ललितेतर साहित्यात व्यावहारिक निकड ही अतिशय महत्त्वाची असते.

ललितेतर साहित्याच्या भाषांतरात सर्वप्रथम भाषांतरामागील उद्देश महत्त्वाचा ठरतो. वेगवेगळ्या क्षेत्रातील ललितेतर साहित्याचे भाषांतर विशिष्ट अशा उद्देशाने, विशिष्ट जनसमुदायाला डोळ्यांसमोर ठेवून केले जात असते. उदा. एखाद्या जाहिरातीचे भाषांतर करताना त्या उत्पादनाचा वापरकर्ता वयोगट काय याचा विचार करून भाषांतर करावे लागते. धार्मिक वा वैचारिक प्रकारचे साहित्य असल्यास त्यानुसार शब्दयोजना भाषांतरकाराला वापरावी लागते. सांस्कृतिक, तांत्रिक, वैज्ञानिक, आर्थिक, ऐतिहासिक, भौगोलिक अशा भिन्न-भिन्न स्वरूपाचा आशय भाषांतरित करताना आवश्यक आणि परिणामकारक भाषा वापरावी लागते.

प्रसारमाध्यमांतील भाषांतर आज झपाट्याने वाढत आहे. बातम्या, भाषणे, मुलाखती, संवाद, माहितीपट, वृत्तपत्रीय लेखन, अहवाल, जाहिराती यांच्या भाषांतराला आज मोठ्या प्रमाणात मागणी वाढते आहे. प्रसारमाध्यम हे स्वतंत्रपणे एक व्यवसायक्षेत्र म्हणून विस्तारित असतानाच त्यात भाषांतर-व्यवहारालाही संधी निर्माण होत आहेत. प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात लिखित आणि मौखिक अशा दोन्ही प्रकारच्या भाषांतराला आज वाढता वाव आहे.

प्रसारमाध्यमांतील ललितेतर भाषांतर करताना विविध अडचणी उभ्या राहतात. सर्वप्रथम, प्रसारमाध्यमांतील मजकुराचे भाषांतर हे कमीत कमी अवधीत पूर्ण करण्याचे आव्हान भाषांतरकारापुढे असते. वृत्तपत्र असो वा वृत्तवाहिनी, कोणत्याही मजकुराचे भाषांतर शक्य तेवढ्या जलदगतीने करण्याच्या अपेक्षेमुळे अनेकदा भाषांतरकाराला पुरेसा वेळ मिळत नाही. घाईगडबडीच्या आणि धावपळीच्या वातावरणात अशी भाषांतरे केल्यामुळे अनेकदा त्यात अनेक त्रुटी राहून जातात.

प्रसारमाध्यमातील ललितेतर भाषांतरे करताना केलेल्या भाषांतराचे पुनरावलोकन करण्याची संधी अभावानेच मिळते. भाषांतर लवकरात लवकर तयार करून पाठवता यावे यासाठी तयार झालेला मजकूर टप्प्याटप्प्याने पाठवण्यात येत असतो. अनेकदा मूळ आशयाचे भाषांतर आणि भाषांतरित मजकुराचे चित्रीकरण वा ध्वनीमुद्रण अशा भिन्न-भिन्न गोष्टी समांतर चालू असतात, त्यामुळे शक्य तेवढ्या लवकर भाषांतरे करावी लागतात. चित्रीकरण, ध्वनीमुद्रण यासारख्या गोष्टींची आर्थिक समीकरणे सांभाळण्यासाठी भाषांतरकाराला कमीत कमी वेळात आपले काम पूर्ण करण्याची धावपळ करावी लागते. अनेकदा अशी भाषांतरे ही अचानकपणे

भाषांतरकाराच्या समोर येतात. एखाद्या आपत्कालिक परिस्थितीमुळे अनेकदा अनेक मजकुरांचे भाषांतर तातडीने करावे लागते. उदा. नैसर्गिक आपत्तीवेळी देण्यात येणाऱ्या सूचना, माहिती इ.

ललितेतर साहित्याच्या भाषांतरात साधनांची कमतरता ही एक महत्त्वाची अडचण असते. अनेकदा तांत्रिक किंवा वैज्ञानिक मजकुरासाठी वा एखाद्या विशिष्ट संज्ञेसाठी पर्यायी लक्ष्यभाषिक शब्द उपलब्ध नसतो. अनेकदा असा पर्यायी शब्द शोधण्यासाठी एखादा शब्दकोश वा पारिभाषिक कोशही उपलब्ध नसतो. अशावेळी स्रोत भाषेतील मूळ शब्दच त्या ठिकाणी वापरावा लागतो. ज्या व्यक्ती वा संस्थेसाठी भाषांतर केले जात आहे त्यांच्या गरजेनुसार, काही वेळा मूळ शब्दच वापरण्याची गरज असते. उदा. गोव्यातील गोमंतक या दैनिकाच्या एका जाहिरातीत वृत्तपत्राच्या शीर्षकाचा श्लेष करून 'गो मन तक' अशी जाहिरात करण्यात आली होती. या जाहिरातीच्या शब्दयोजनेत एकाचवेळी तीन भाषांतील शब्द वापरण्यात आलेले होते. अशा प्रसंगांत भाषांतर करताना तोच भाव लक्ष्य भाषेत आणणे शक्य होत नाही.

ललितेतर साहित्याचे भाषांतर करताना भाषांतर कोणासाठी केले जात आहे याचाही विचार खूप महत्त्वाचा ठरतो. ज्या व्यक्ती वा संस्थेसाठी भाषांतर करावयाचे आहे ती व्यक्ती वा संस्था कोण आहे याचाही मानसिक ताण भाषांतरकारावर असतो. वास्तविक अशा भाषांतरात मजकुराच्या संदर्भात अडचणी असतीलच असे नाही परंतु ज्या घटकासाठी हा भाषांतर व्यवहार हातात घेतला जात आहे त्या घटकाचा असणारा एक अदृश्य मानसिक ताण भाषांतरकारासमोरील आव्हान असते.

माननीय प्रधानमंत्र्यांच्या 'मन की बात' या मासिक जनसंवाद कार्यक्रमाचे भाषांतर करत असता हा मानसिक ताण अनेकदा माझ्या अनुभवाला आलेला आहे. सर्वप्रथम, कोणत्याही मजकुराचे भाषांतर करण्यासाठी तो मजकूर शक्य तेवढ्या लवकर भाषांतरकाराला मिळणे आवश्यक असते. स्रोत भाषेतील मजकुराचे वाचन करून त्या शब्दांचा अर्थ लावणे, पर्यायी शब्द शोधणे, वाक्यरचनेतील बदल, लक्ष्य भाषेतील वाचक वर्ग आणि इतर मुद्द्यांच्या आधारे लक्ष्य मजकुराची मांडणी भाषांतरकाराला करावी लागते. 'मन की बात'ची मूळ (हिंदी आणि इंग्रजी) प्रत भाषांतरकाराला प्रसारणाच्या आदल्या दिवशी पाठवण्यात येत असते. असे झाल्याने, भाषांतरकारासमोर कालावधीचे फार मोठे आव्हान उभे राहते. ज्या व्यक्तीच्या मजकुराचे भाषांतर करावयाचे आहे त्याचाही ताण भाषांतर करताना असतो. प्रधानमंत्री पदावरील व्यक्तीच्या भाषणाचे भाषांतर हा असाच एक अनुभव असतो.

'मन की बात' च्या अनुषंगाने विचार करता, ललितेतर साहित्याच्या भाषांतरातील भाषाशैलीच्या अडचणींचाही विचार करावा लागतो. 'मन की बात' ची एकूण रचना संवादरूपी असल्याने त्यात प्रधानमंत्रींनी देशातील जनतेशी साधलेला संवाद असतो. या संवादातील भाषा, वाक्यरचना अनेकदा अनौपचारिक आणि घरगुती प्रकारची असते. अन्य भाषांतील शब्दांचा वापर, अपूर्ण वाक्ये, अर्धवट संवाद अशा तऱ्हेची भाषा 'मन की बात' मध्ये पाहायला मिळते. अशा प्रकारच्या मजकुराचे भाषांतर करताना भाषांतरकारासमोर आव्हाने निर्माण होतात.

एखाद्या मजकुराचे भाषांतर करताना मूळ मुद्द्याविषयी काही शंका असल्यास, अडचण असल्यास वेगवेगळ्या साधनांचा वापर करता येतो वा मूळ लेखकाशी (हयात असल्यास) संपर्क करून देखील चर्चा करता येत असते. 'मन की बात' सारख्या मजकुरांच्या भाषांतरावेळी असा कोणताही पर्याय भाषांतरकारासमोर उपलब्ध नसतो. मुळातच, ही संवादरूपी चर्चा अनौपचारिक स्वरूपाची असते आणि त्याचबरोबर 'प्रधानमंत्री' पदावरील व्यक्तीचा तो संवाद असल्याने त्यांच्याशी थेट चर्चा करून एखाद्या मुद्द्याची चर्चा करणे देखील शक्य होत नाही. दुसऱ्या बाजूस, भाषांतराच्या तत्त्वानुसार भाषांतरकार काहीही वगळू शकत नाही वा भर घालू शकत नाही. त्यामुळे असा एखादा अडचणीचा मुद्दा सोडूनही देता येत नसतो. ललितेतर भाषांतरकारासमोर येणारी ही अशी अडचण परीक्षा पाहणारी असते.

'मन की बात'मध्ये येणारे विविध शब्दप्रयोग हाही भाषांतराच्या दृष्टीने एक आव्हानाचा विषय आहे. वापरलेल्या शब्दांसाठी पर्यायी शब्द नसणे ही एक प्रकारची अडचण असते. परंतु, या भाषांतरात मात्र अनेकदा मूळ भाषणात वापरलेला शब्दच तसाच्या तसा लक्ष्य भाषेत वापरण्याचे निर्देश भाषांतरकाराला दिले जातात. उदा. 'मन की बात'मध्ये प्रधानमंत्री अनेकदा नामवंत व्यक्तींना संबोधित करताना 'जी' संबोधनाचा वापर करतात. कोंकणी भाषेत 'जी' या संबोधनासाठी 'बाब' असा शब्दप्रयोग केला जातो. त्यामुळे अनेकदा 'नरेंद्रजी यांच्या' अशा आशयाच्या वाक्यांचे कोंकणी भाषांतर करताना 'नरेंद्रबाबांच्या...' असे बनते. प्रस्तुत कार्यक्रम श्राव्य स्वरूपाचा असल्याने 'नरेंद्रबाबांच्या...' अशा शब्दांमुळे अनेकदा ऐकणाऱ्यांचा घोळ होतो.

'मन की बात' कार्यक्रमात अनेकदा मूळ भाषणातील इंग्रजी शब्द जसेच्या तसे लक्ष्य भाषेत नेण्यास सांगितले जाते. त्या शब्दांसाठी पर्यायी शब्द असले तरी देखील तेच मूळ शब्द वापरावे असे भाषांतरकाराला सांगितले जाते. ज्या व्यक्ती/ संस्थेसाठी भाषांतर केले जात आहे त्यांची गरज लक्षात घेऊन भाषांतर करावे लागत

असते या तत्त्वानुसार अशा शब्दांचा वापर अपरिहार्य ठरतो; परंतु, लक्ष्य भाषेतील श्रोतृवर्गाला अर्थग्रहण करताना अडचणींचा सामना करावा लागतो.

ललितेतर साहित्याचे भाषांतर आज वेगवेगळ्या क्षेत्रांत विकसित होत आहे. जाहिराती, रस्त्यावरील सूचना, पर्यटन व्यवसाय, प्रसारमाध्यमे यासारख्या क्षेत्रांत लिखित आणि मौखिक भाषांतराला आज प्रचंड मागणी आहे. मोजक्याच शब्दांत मूळ मजकूर बिनचूक आणि लक्षवेधी पद्धतीने वाचकांपर्यंत पोहचवण्याचे कसब भाषांतरकाराजवळ असावे लागते. त्यासाठी अभ्यास, संशोधन, मेहनत आणि अनुभव ह्या गोष्टी तितक्याच आवश्यक आहेत हेही तेवढेच लक्षात घेतले पाहिजे. आधुनिक काळात ललितेतर भाषांतराच्या नवनवीन संधी या विविध क्षेत्रांत निर्माण होत आहेत. स्रोत आणि लक्ष्य भाषेवर उत्तम पकड ठेवत मर्यादित वेळेत, उपलब्ध साधनांच्या मदतीने (किंवा त्याविना) अचूक भाषांतर करता येण्याची हातोटी आज भाषांतरकारांकडून अपेक्षित असते. रोजगाराची एक उत्तम संधी म्हणून तरुणांनी या क्षेत्राचा विचार नक्कीच केला पाहिजे.

**संदर्भ :**


१. भाषांतरमीमांसा, डॉ. कल्याण काळे, प्रतिमा प्रकाशन

२. भाषांतर चिकित्सा, डॉ. मधुकर मोकाशी, स्नेहवर्धन प्रकाशन

३. भाषांतर, डॉ. सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मय गृह प्रकाशन

४. व्यावहारिक मराठी, डॉ. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन

५. 'मन की बात', आकाशवाणी/दूरदर्शन, प्रसार भारती, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार


■